# प्रेसनोट

दि.१७/१०/२०२३

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | नाशिक/अहमदनगर |
| गुन्हा नोंद क्रमांक | जामखेड पो.स्टे., जि.अहमदनगर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे. |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १९८८ चे कलम ७ |
| आरोपीचे नांव व कार्यालय | संतोष शांतीनाथ अष्टेकर, वय–४१ वर्ष, पद–बाहयस्त्रोत वायरमन, म.रा.वि.वि. कंपनी, जामखेड सेक्शन, ता.जामखेड, जि.अहमदनगर |
| मागणी केलेल्या लाचेची रक्कम | २५००/– रुपये |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | २०००/– रुपये |
| थोडक्यात माहिती | प्रस्तुत बातमीतील हकीगत अशी की, यातील तक्रारदार यांचे रामेश्वरनगर, जामखेड येथे घराचे बांधकाम चालू असून त्यांच्या बांधकाम चालु असलेल्या प्लॉट समोर म.रा.वि.वि. कंपनीची विदयुत वाहिनी असल्यामुळे विदयुत पुरवठा चालू असतांना समोरील बाजूचे कामकाज करता येत नव्हते, त्यामुळे सुरक्षितरित्या बांधकाम करण्यासाठी विदयुत पुरवठा खंडीत करणे आवश्यक होते. त्यामुळे यातील तक्रारदार यांनी त्यांच्या भागातील वायरमन आरोपी लोकसेवक संतोष शांतीनाथ अष्टेकर यांना विदयुत पुरवठा खंडीत करण्याबाबत विनंती केली असता त्यांनी यापूर्वी ४ वेळा विदयुत पुरवठा २ तासासाठी खंडीत करुन दिला होता, त्यासाठी फी म्हणून ५००/– रुपये घेतले होते. काल दिनांक १६/१०/२०२३ रोजी यातील आरोपी लोकसेवक अष्टेकर यांनी वीज खंडीत करण्याचे प्रत्येकी ५००/– रुपये प्रमाणे यापूर्वी ४ वेळा वीज खंडीत केलेबाबत व आज रोजीची १०.३० ते १२.३० या वेळात वीज खंडीत करणेसाठी असे एकूण पाच वेळा वीज खंडीत करण्याचे २५००/– रुपये लाच मागणी करत असल्याची तक्रार लाचलुचपत प्रतिबंधक विभाग अहमदनगर कार्यालयाकडे प्राप्त झाली होती. त्यानुसार आज दि.१७/१०/२०२३ रोजी पंचासमक्ष लाच मागणी पडताळणी करण्यात आली असता यातील आरोपी लोकसेवक अष्टेकर यांनी प्रत्येक वेळी वीज खंडीत करण्यासाठी ५००/– रुपये प्रमाणे २५००/– रुपये लाच मागणी करुन २०००/– रुपये लाच रक्कम स्वीकारण्याचे मान्य केल्याचे तसेच यापूर्वी ५००/– रुपये लाच रक्कम स्वीकारल्याचे देखील मान्य केल्याचे लाच मागणी पडताळणी कारवाई मध्ये निष्पन्न झाले. आरोपी लोकसेवक अष्टेकर याने आज दि.१७/१०/२०२३ रोजी जामखेड येथे तक्रारदार यांच्या बांधकाम चालू असलेल्या प्लॉट समोरील डीपी जवळ आयोजित केलेल्या सापळा कारवाई दरम्यान पंचासमक्ष तक्रारदार यांच्याकडून २०००/– रुपये लाच रक्कम स्वीकारली असता त्यांना रंगेहाथ पकडण्यात आले आहे. सदर बाबत आरोपी लोकसेवक अष्टेकर यांचेविरुध्द जामखेड पोलीस स्टेशन, जि.अहमदनगर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे. |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागण्या–या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य यांच्याशी संपर्क करावा.

संपर्क पत्ता :– लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालय, जिल्हा मध्यवर्ती प्रशासकिय इमारत,
टि.व्ही. सेंटरसमोर, सावेडी, अहमदनगर

संकेतस्थळ :– acbmaharashtra.gov.in

ई–मेल :– acbwebmail@mahapolice.gov.in

ऑनलाईन तक्रार

ॲप्लीकेशन :– acbmaharashtra.net

टोल फ्री क्रमांक :– १०६४

दुरध्वनी क्रमांक :– ०२४१–२४२३६७७

व्हॉटस अप क्रमांक :– ९९३०९९७७००

(प्रविण लोखंडे)
पोलीस उप अधीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
अहमदनगर